# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ६६३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ११/१०/२०१६

**१) आमरोडवरील सोलर लाईटची बॅटरीची चोरी . :–**

दिनांक ०१/१०/२०१६ चे ००.३० वा. दर. यातील अज्ञात चोराने विरली खंदार येथे ग्रामपंचायत तर्फे सार्वजनीक रोडवर लावलेली सोलर लाईटची बॅटरी व विजरोधक कि. १५,०००/–रु. ची चोरुन नेल्याने फिर्यादी चंद्रशेखर ग्यानीराम लाजेवार वय ३५ वर्ष रा. विरली खंदार यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. नंदेश्वर पो.स्टे. अडयाळ हे करीत आहेत.

**२) शेतीच्या वादावरुन शिविगाळ व विळयाने मारुन जखमी केला . :–**

दिनांक १०/१०/२०१६ रोजी १६.५० वा. दर. यातील फिर्यादी शिवलाल सिताराम ठाकरे वय ५६ वर्ष, रा. बोरगांव हा आपल्या बांधीवरील तिळ कापत असतांना यातील आरोपी हा फिर्यादीजवळ येवुन तु माझे बांधीची खांड फोडुन माझे बांधीत पाणी का सोडले असे बोलुन भांडण, शिविगाळ करुन हातातील गवत कापण्याच्या विळयाने फिर्यादीचे डावे कानाचे वर डोक्याला मारुन जखमी करुन धमकी दिल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम ३२४,५०४,५०६ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. चिंचखेडे पो. स्टे. सिहोरा हे करीत आहेत.

**३)अज्ञात वाहन चालकांच्या हयगयीने, एकाचा मृत्यु . :–**

दिंनाक. ०१/०९/२०१६ रोजी १०.०० वा. दर. यातील मृतक अजय रविलाल कुंभरे वय २८ वर्ष, रा. वळोदा जि. नागपुर हा मित्र अब्बास याचे दुचाकी गाडी घेवुन भंडारा वरुन मौदा कडे गावी जात असतांनी बेल्याजवळ एन. एच. ६ रोडवर यातील अज्ञात आरोपी वाहन चालकाने धडक मारुन मृतकास डोक्याला जबर मार लागल्याने त्यास सा. रु. भंडारा येथे प्राथमिक औषधोपचार करुन मेडीकल कॉलेज नागपुर येथे दिनांक ०१/०९/२०१६ चे १९.०० वा. मृतक मरण पावल्याने पो. स्टे. अजनी नागपुर येथे मर्ग क्र. ००/१६ कलम १७४ जाफौ चे कागदपत्र पो.स्टे. भंडारा येथे प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोउपनि. शिंदे यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे भंडारा येथे कलम ३०४ (अ) भांदवि. अन्वये नंबरी गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. शिंदे पो. स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**४) विवाहीतेचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०८/१०/२०१६ ते १०/१०/१०१६ पर्यत. यातील आरोपीने आपल्या मोबाईल क्र. वरुन फिर्यादीचा मोबाईल क्र. वर अश्लिल मॅसेज पाठवुन तिची लैगिक छडवणुक करुन तिचा विनयभंग केल्याने फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३५४(अ)(२)(३) भांदवि. सहकलम ६७ माहिती व तंत्रंज्ञान अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. शिंदे पो. स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**५) अवैध दारु अडयांवर धाडी . :–**

दिनांक १०/१०/२०१६ रोज़ी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. तुमसर, सिहोरा, गोबरवाही व लाखांदुर येथील अवैध दारु अडयांवर धाडी घालुन एकुण ०७ गुन्हे दाखल करुन आरोपीतांच्या ताब्यातुन ६३ लिटर हातभटटी कि. ३,५६०/–रु. तसेच १ लिटर ६२० मिली लिटर देशी कि. ४५०/–रु. असा एकुण ४,०१०/–रु. चा माल जप्त करण्यात आले आहे.

प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ९९२१७४१६८१

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.